# -: प्रेसनोट दिनांक - ०७/१०/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त), रा.मरोशी भवानीनगर, प्लॉट नं.झेड - ३ डॅफोडील्स बिल्डींग प्लॅट नं.३०४ मरोळ मुंबई व त्यांची पत्नी यांचेविरूध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल .........**

---

आरोपी लोकसेवक खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त), रा.मरोशी भवानीनगर, प्लॉट नं.झेड - ३ डॅफोडील्स बिल्डींग प्लॅट नं.३०४ मरोळ मुंबई यांचेविरुध्द लाच प्रकरणी दि. १७/०७/२०१८ रोजी शाहुपूरी पोलीस ठाणे गु.र.नं. ४०१/२०१८ भ्र.प्र. अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड),१३(२) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

नमुद गुन्हा दाखल झालेनंतर त्यांचे निवासस्थानाची घरझडती घेण्यात आली होती. त्यावरून आरोपी लोकसेवक खुशाल सपकाळे यांचे मालमत्तेची उघड चौकशी करणेबाबत मा. पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचेकडुन आदेश प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे आरोपी लोकसेवक खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त) यांचे मालमत्तेची उघड चौकशी तत्कालीन चौकशी अधिकारी व वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे परिक्षेत्र, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली केलेली आहे.

मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त) यांनी त्यांचे व त्यांचे कुटूंबियांचे नावे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतापेक्षा एकुण १,६६,३३,९९१/- रुपये अपसंपदा (बेहिशेबी मालमत्ता संपादित) केली असुन त्यांचे प्रमाण ७५.९८ % निष्पन्न झाले आहे.

श्री. खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त) यांनी व त्यांचे कुटूंबियांनी वर नमुदप्रमाणे अपसंपदा धारण केल्याने त्यांचे, त्यांची पत्नी सौ. हेमांगी खुशाल सपकाळे यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम १३ (१)(ई) सह १३(२) सह भा.दं.वि.सं.कलम १०९ प्रमाणे वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी सदरची चौकशी पुर्ण करून सरकार तर्फे लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे आज रोजी गुन्हा दाखल केला आहे. खुशाल विठठल सपकाळे, तत्कालीन समादेशक भारत राखीव बटालियन क्र.३ कोल्हापूर,(सेवानिवृत्त) यांचे घराची व इतर संपादित मालमत्तेची झडती प्रक्रिया सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास हे श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र पुणे हे करीत आहेत.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत काही तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९. ९४०४३२१०६४

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.